चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
१४ मार्च, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# चंद्रपुर पोलीसांची कुंकटखाण्यावर धाड
# १० महिलांची केली सुखरूप सुटका

दि. १४ मार्च २०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेने गोपनिय माहितीच्या आधारे गौतम नगर स्थित एका घरात धाड मारून एकुण १० महिलांची वेश्याव्यवसायातुन सुटका केली.

स्थानिक गुन्हे शाखेस दि. १४ मार्च २०१९ रोजी दुपारच्या वेळेत खात्रीशिर गोपनिय माहिती मिळाली की गौतम नगर येथे एका घरात काही अल्पवयीन मुलींकडून देहव्यापार करवुन घेतल्या जात आहे. तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेचे एक पथक व फ्रिडम फर्म या सामाजीक संस्थेच्या सद्स्यासोबत ठिकाणावर रवाना करण्यात आले. मिळालेल्या माहितीची पंटरव्दारे शहानिशा करून धाड मारली असता सदरच्या कुंकटखान्यावर एकूण १० महिला या व्यवसायात गुरफटलेल्या मिळून आल्या. या महिलांची आर्थिक परीस्थीती खराब असल्याने त्यांना पैशाचे प्रलोभन देवुन त्यांना वेश्याव्ययसायात ओढल्याचे सदरच्या महिलांनी आपली आपबिती पोलीसां समोर मांडली. या १० ही महिलांना सुधार गृह येथे रवाना करण्यात आले व एक महिला आरोपीस ताब्यात घेण्यात आले.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधिक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोनी श्री. ओमप्रकाश कोकाटे यांच्या नेतृत्वात पोउपनी जावेद शेख यांचे पथक सफौ. पंडीत, नापोशी. मनोज, नईम, जमीर, गजानन, पोशी रवींद्र, जावेद, मपोशी भारती, सोनाली, सिमा, अपर्णा यांनी पार पाडली.

---